**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

दुरध्वनी क्रं. 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com


जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/सुचना/3448/2025-26 दिनांक :-15/12/2025

## संघ लोकसेवा आयोग (UPSC) - 2025-26 स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सुचना

महाज्योतीमार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC) - 2025-26 स्पर्धा परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेची मेरीट यादी तसेच पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच याद्वारे प्रशिक्षण सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित प्रशिक्षण केंद्रात प्रत्यक्ष जाऊन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करुन घ्यावी.

- **प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-**
  1. आधारकार्ड
  2. जातीचे प्रमाणपत्र
  3. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
  4. पदवी उत्तीर्ण गुणपत्रिका /प्रमाणपत्र/ उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र

     (मुळ कागदपत्रे व स्वंय स्वाक्षांकित झेरॉक्स घेवून उपस्थित राहावे.)

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे :-**

  **ज्ञानदिप ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र**

  **संपर्क क्र.** 1) श्याम भोसले (8888136599) व 2) माधुरी पोपडे (8830146428)

  **ई-मेल आयडी** - dnyandeepacademy9@gmail.com

  **पत्ता** - TCG स्क्वेअर बिल्डींग, अल्का टॉकीज समोर, अल्का टॉकीज चौक, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे, पिनकोड - 411030

- **<u>प्रशिक्षण केंद्रास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना</u>** :-

1. प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल, याची नोंद घ्यावी.
2. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा यापूर्वी महाज्योतीच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
3. ज्या विद्यार्थ्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), संघ लोकसेवा आयोग (UPSC) व महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क' या स्पर्धा परीक्षापुर्व प्रशिक्षणाकरीता झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी कोणत्याही एकाच प्रशिक्षणाकरीता संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रवेश करण्यात यावे.
4. सोबत जोडण्यात आलेल्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेत प्रवेश देण्यात येईल. तसेच कोणत्याही प्रकारची पुरविण्यात आलेली माहिती चुकीची आढळून आल्यास सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येईल.
5. संघ लोकसेवा आयोग (UPSC) या स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना सदरचे प्रशिक्षण दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमार्फत घ्यावयाचे असल्यास त्याबाबत चे ई-मेल nikita.mahajyoti@gmail.com या मेल आयडीवर महाज्योती कार्यालयास दि.16/12/2025 रोजी पर्यंत पाठविण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांचे इ-मेल महाज्योतीच्या nikita.mahajyoti@gmail.com या मेल आयडीवर प्राप्त होतील केवळ अशाच विद्यार्थ्यांचे दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेकरीता जागा राखीव ठेवण्यात येईल. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.
6. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाकरीता रूजू होण्यास इच्छुक असल्यास त्याबाबताचा अहवाल आजच प्रशिक्षण संस्थेच्या दिलेल्या संपर्क क्रमांकावर तसेच ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावे.

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर